# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 June 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १ जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- शेतकऱ्यांचा विश्वास हाच आपला अमूल्य ठेवा-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
- नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना शेतकरी सन्मान निधी योजनेचा १७ वा हप्ता जारी-महाराष्ट्रातल्या सुमारे नव्वद लाख अठ्ठेचाळीस हजार शेतकऱ्यांचा समावेश.
- विधान परिषदेच्या अकरा जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर.

आणि

- राज्य सरकारसोबत चर्चेसाठी कोणतंही शिष्टमंडळ जाणार नाही-ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांची स्पष्टोक्ती.

****

देशातल्या शेतकऱ्यांनी आपल्यावर विश्वास ठेवत, सलग तिसऱ्या कार्यकाळात सेवेची संधी दिली, शेतकऱ्यांचा हा विश्वासच आपला अमूल्य ठेवा असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज वाराणसी इथं झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी शेतकरी सन्मान निधीअंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेचा १७ वा हप्ता जारी केला, त्यावेळी ते बोलत होते. ही योजना आज जगभरातली सर्वात मोठी थेट लाभ हस्तांतरण योजना असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. आज जारी झालेली रक्कम नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होईल. यात महाराष्ट्रातल्या सुमारे नव्वद लाख अठ्ठेचाळीस हजार शेतकऱ्यांचा समावेश असून, या सर्वांना मिळून एक हजार आठशे पंचेचाळीस कोटी सतरा लाख रुपये वितरीत झाले आहेत.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना, तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेचा लाभ झाला आहे. उत्तर प्रदेशातल्या वाराणसी इथं झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते, स्वयं सहाय्यता गटातल्या ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटपही करण्यात आलं. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, उत्तरप्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

देशभरात निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन यावेळी करण्यात आलं. हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात, केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेक उपाययोजना करत आहेत. भविष्यातही शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी शासन कटीबद्ध असेल, अशी ग्वाही रक्षा खडसे यांनी यावेळी दिली.

****

योग तसंच भरड धान्यासंबंधी जागरूकता निर्माण करुन लोकांचं आयुष्य सुदृढ करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या सरपंचांना एका पत्राद्वारे केलं आहे. यंदाच्या योगदिनी, पंचायत, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र आणि इतर ठिकाणी योग आधारित कार्यक्रमांचं आयोजन करण्याचं आवाहनही त्यांनी या पत्रातून केलं आहे. स्वतःसाठी आणि समाजासाठी योग, ही यंदाच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाची संकल्पना आहे.

****

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा श्रीनगर इथं होणार आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

दरम्यान, योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उष्ट्रासनाची माहिती देणारी एक चित्रफित आज सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. या आसनामुळे पाठीचे आणि मानेचे स्नायू मजबूत होतात, त्याचबरोबर रक्ताभिसरण सुधारण्यासोबतच दृष्टीही सुधारते. या आसनाचा सराव करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

****

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत महाराष्ट्रात खरीप हंगाम – २०२४ साठी पीक विमा भरण्याची सुरुवात शासनाच्या www.PM FBY.gov.in या पोर्टलवर आजपासून करण्यात आली आहे. याही वर्षी शेतकऱ्यांना आपल्या अधिसूचित पिकांचा विमा भरण्यासाठी फक्त एक रुपया भरावा लागणार असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. या योजनेत सहभागी होण्याची अंतिम तारीख पंधरा जुलै ही असून, शेतकऱ्यांनी त्यापूर्वी विमा भरून घ्यावा, असं आवाहनही कृषीमंत्र्यांनी केलं आहे.

****

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अकरा सदस्यांचा कार्यकाळ येत्या सत्तावीस जुलैला संपत असल्यानं निवडणूक आयोगानं या सदस्यांच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीची घोषणा केली आहे. याबाबतची अधिसूचना येत्या पंचवीस जूनला जारी होणार आहे. अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख दोन जुलै ही असून, उमेदवारांना पाच जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता भासल्यास, येत्या बारा जुलैला मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी पाच वाजता मतमोजणी होणार आहे.

****

राज्याच्या सामान्य प्रशासन विभागानं आज प्रशासन सेवेतल्या सात अधिकाऱ्यांच्या नियुक्ती आणि बदल्यांचे आदेश जारी केले. यामध्ये कृषी विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची असंघटित कामगार विकास आयुक्त, या पदावर बदली करण्यात आली असून, व्ही.राधा यांची कृषी विभागाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाचे उपसचिव अमन मित्तल यांची बदली महाराष्ट्र इन्स्टिटयूट फॉर ट्रान्सफॉर्मेशनच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर करण्यात आली आहे.

****

चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, अशी शक्यता फिच रेटिंग्ज या संस्थेनं वर्तवली आहे. मार्च महिन्यात या संस्थेनं ७ टक्के वृद्धी दराचा अंदाज वर्तवला होता,मात्र भारतात वाढलेली गुंतवणूक आणि वाढलेल्या खर्चामुळं या अंदाजात सुधारणा केल्याचं फिचनं म्हटलं आहे.

****

१८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज माहितीपट, लघु आणि ॲनिमेशन चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. यामध्ये स्टोरी ऑफ अ पेंटिंग, एलियन, टेल्स ऑफ ऑब्लिव्हियन, आदी चित्रपटांचा समावेश आहे.

****

भारतीय चित्रपट निर्माते विनोद गणात्रा यांना बालचित्रपटांमधल्या योगदानाबद्दल दक्षिण आफ्रिकेचा प्रतिष्ठित नेल्सन मंडेला जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार मिळालेले ते पहिले भारतीय ठरले आहेत. ७व्या नेल्सन मंडेला बालचित्रपट महोत्सवामध्ये त्यांना या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

****

राज्य सरकारसोबत चर्चेसाठी आपलं कोणतंही शिष्टमंडळ जाणार नसल्याचं, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सांगितलं आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये या मागणीसाठी, जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं हाके यांच्यासह नवनाथ वाघमारे यांचं उपोषण सुरु आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

****

विधीज्ञ उज्ज्वल निकम यांनी लोकसभा निवडणूक लढवलेली असताना त्यांची सरकारी वकील पदावर नियुक्ती करुन भाजपा सरकार चुकीचा पायंडा पाडत असल्याची टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. सरकारनं या नियुक्तीचा फेरविचार करावा, अशी मागणी पटोले यांनी केली.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठीची नीट परीक्षाच रद्द करावी अशी मागणी पटोले यांनी केली. पावसाळा सुरु झाला असताना पोलिस भरतीसाठी शारिरीक चाचणी घेण्याच्या निर्णयावरही पटोले यांनी टीका केली. पोलीस भरतीच्या शारिरीक चाचणीबाबतही सरकारने फेरविचार करावा, असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

नीट परीक्षेबाबत विशेष तपास पथक गठीत करून सखोल चौकशी करावी अशी आग्रही मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. जातनिहाय जनगणनेच्या मागणीचाही त्यांनी पुनरुच्चार केला.

****

बीड जिल्ह्यातला नियोजित शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या मागणीसाठी बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं आज शेतकऱ्यांनी निदर्शनं केली. या नियोजित महामार्गामध्ये मराठवाड्यातली पाण्याखालची सुपीक बागायती जमीन जाणार असल्याचा दावा करत, शासनानं सुपीक जमिनींमधून हा मार्ग नेऊ नये, अशा मागणीचं निवेदन आंदोलक शेतकऱ्यांनी यावेळी प्रशासनाला दिलं. याच मागणीसाठी आज कोल्हापूरमध्येही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा काढण्यात आला. शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीनं या मोर्चाचं आयोजन केलं होतं.

****

वीजेचे स्मार्ट मीटर बसवण्याचा निर्णय रद्द होईपर्यंत याविरोधात आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षानं दिला आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या पत्रकार परिषदेत पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य तसंच शहर सचिव विधीज्ञ अभय टाकसाळ यांनी ही माहिती दिली. यासंदर्भात अदानी पावर, एन सी सी, ईत्यादी कंपन्यांना दिलेलं कंत्राट विधानसभा निवडणुकीपूर्वीच रद्द केलं पाहिजे, असं टाकसाळ यांनी यावेळी सांगितलं.

****